# महिला सबलीकरण आणि शासकीय योजना : एक चिकित्सक अभ्यास

**डॉ. सुनिल पांडूरंग सूर्यवंशी,** नाइट कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर
**डॉ. दिपक वामनराव सुर्यवंशी,** एस. के. पाटील महाविद्यालय, कुरुंदवाड

---

**सारांश :**

भारतीय समाजात महिलांना दुय्यम स्थान आहे, असे म्हणण्याची परिस्थिती आता बदलण्याचा मार्गावर आहे. कारण महिलांना प्राधान्य देण्याच्याबाबी शासनाच्यावतीने घडत आहेत. अनेक शासकीय निर्णय महिलांच्या उज्वल भवितव्यासाठी घेण्यात येत आहेत. महिलांच्या विकासासाठी अनेक योजना केंद्र व राज्यशासन राबवीत आहे. या योजनांच्या माध्यमातून महिलांच्या सर्वांगीण विकास घडवून आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. महिलांवरील अत्याचाराचे निराकरण 'करणे, महिलांचा आर्थिक दर्जा सुधारणे, स्त्री संवेदनशील धोरणांना प्रोत्साहन देणे, स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये तसेच इतर सर्व विकास क्षेत्रांमध्ये महिलांचा सहभाग वाढवून त्यांना आर्थिक, सामाजिक आणि कौटुंबीकदृष्ट्या सूरक्षीत करण्यावर भर देण्यात येत आहे. आजची मुलगी उदयाची माता आणि देशाचा आधार असते हे लक्षात घेतले तर मुलगी ते महिला या तीच्या वाढीतील प्रत्येक टप्प्यावर शासनाने सहकार्याचा, संरक्षणाचा हात पुढे केला आहे. परंतु आजही पाहिजे त्या प्रमाणात महिलांचे सबलीकरण झालेली नाही, कारंण सर्व योजनाची प्रभावीपणे जनजागृती व अमंलबजावणी झालेली नाही. त्यामुळेच प्रस्तुत शोधनिबंधासाठी "महिला सबलीकरण शासकीय योजना" हा विषय निवडला आहे.

**बीज संज्ञा :** महिला सबलीकरण, शासकीय योजना, जनजागृती

**प्रस्तावना :**

देशाची प्रगती साधत असताना महिलांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, कारण पुरुष आणि महिला हे दोघेही समाजव्यवस्थेचे घटक असून दोघांचीही निश्चित भूमिका आहे. ती परस्परांना पूरक अशीच आहे. म्हणून शासनाने महिलांचे सबलीकरण व विकासासाठी विविध योजना अमलात आणाल्या आहेत. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशाच्या विकासासाठी योजना सुरु झाल्या तेव्हा पासूनच महिला सबलीकरणाला प्राधान्य देण्यात आले. परंतु प्रत्यक्षात पाचव्या व सहाव्या पंचवार्षिक योजनेत विविध पातळीवर महिला सबलीकरणासाठी योजना सुरु झाला. विविध विकास लाभापासून महिला वंचित राहणार नाही यांची काळजी घेतली गेली. कारण राष्ट्र उभारणी मध्ये स्रीयांचा सहभाग वाढविण्याचा असेल तर महिलाचा विकास करणे गरजेचे आहे, असे स्पष्ट करण्यात आले. आणि येथूनच खऱ्या अर्थाने देशात महिला सबलीकरणाच्या दृष्टीने पावले उचलली गेली. त्याचाच यामध्ये विचार केला आहे.

**उद्देश :** प्रस्तुत शोधनिबंधाचे उद्देश खालील प्रमाणे आहेत.

1. भारतीय समाजातील महिलांचे स्थान शोधणे.
2. महिला सबलीकरणासाठीच्या योजना अभ्यासणे.
3. भारतीय महिलांनमध्ये सबलीकरणाकरीता शासकीय योजनांची जनजागृती निर्माण करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी व्दितीय सामग्रीचा उपयोग केला आहे. विविध संदर्भ ग्रंथ, जर्नल, नियतकालिका, मासिके, शासकिय व निमशासकीय अहवाल, वेबसाईट इत्यादीच्या माध्यमातून माहिती संकलित केली. संकलित केलेल्या माहितीचे शास्त्रीय पध्दतीने संस्करण करुन विश्लेषण केले.

**विषय विवेचन**

भारतीय राज्यघटने प्रत्येक नागरीकाला सामाजिक न्याय, समता, प्रतिष्ठा प्राप्त करुन दिलेली आहे. धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या आधारे कुठलाही भेदभाव पाळला जाणार नाही. सेवेतील दर्जा आणि संधीमध्ये समानता राहील असा उल्लेख राज्यघटनेत आहे. पण सत्य परिस्थिती अशी आहे की, महिलांच्या सर्वच मानवी अधिकारामध्ये विरोधाभास दिसून येतो. पुरुष प्रधान संस्कृतीची जोपासना केली जाते व महिलांना सन्मान नाही. त्यामुळे बदलत्या परिस्थितीनुसार महिलांच्या हित संवर्धनासाठी शासनाकडून प्रयत्न केले जात आहे. महिलांचा आर्थिक दर्जा सुधारणे, स्त्री संवेदनशील धोरणांना प्रोत्साहन देणे, प्रसारमाध्यमांचा वापर करून महिलांच्या हकाप्रती जनजागृती करणे, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये तसेच इतर सर्व विकास क्षेत्रामध्ये महिलांचा सहभाग वाढवून त्यांना आर्थिक, सामाजिक आणि कौटुंबिकदृष्ट्या सुरक्षित करण्यासाठी शासनस्तरावर योजना विविध योजना राबवला जातात.

**महिला सबलीकरण आणि शासकीय योजना**

**१) रोजगार आणि उत्पन्न प्राप्ती**

रोजगार आणि उत्पन्न निर्माण करुन देणारी ही योजना सन १९८२-१९८३ मध्ये सुरु केली. समाजातील दुर्बल घटकातील महिलांना प्रशिक्षण देणे आणि त्यांना रोजगार उपलब्ध करुन देणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. यामध्ये छपाई, पुस्तक बांधणी, हातमाग, सूत विणणे, कपडे तयार करणे इ. चे प्रशिक्षण महिलांना दिले जाते.

**२) स्टेप योजना**

सन १९८५-८६ मध्ये महिलांसाठी स्टेप योजना आखली गेली. महिलांना रोजगार कौशल्य प्राप्त करुन देणे, त्यांना संघटित करणे, सरकारी गटाच्या माध्यमातून मजबूती प्राप्ती करुन देणे, आधारभूत सेवा आणि कर्ज उपलब्ध करुन देणे, शाश्वत रोजगाराची व्यवस्था निर्माण करणे या मुख्य उद्देशाने ही योजना सुरु करण्यात आली. या योजनेअंतर्गत देशातील विविध २५० प्रकल्पांना अर्थसहाय्य केले जाते. यात कृषी, पशूसर्वधन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय, हातमाग, रेशीम उद्योग, खादी व ग्रामोद्योग, पडीक भूमी विकास व सामाजिक वनीकरण या १० पारंपारिक क्षेत्रांचा समावेश आहे.

**३) महिला विकास मंडळाची स्थापना**

सन १९८६-८७ साली सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी महिला विकास मंडळांची स्थापना करण्यात आली. स्त्रीया आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनाव्यात यासाठी रोजगाराच्या उत्तम संधी मिळवून देणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट्य आहे. संपूर्ण भारतात १२ राज्यात अशी महिला विकास मंडळे आहेत.

**४) महिला समृध्दि योजना -**

सन १९९२ पासून ही योजना सुरु केली. या योजनेव्दारे ग्रामीण क्षेत्रातील महिलांना रोजगार व बचत सहाय्य करुन आर्थिक स्वरुपात सशक्त केले जाते. महिलांमध्ये बचतीचे महत्व पटवून दिले जाते.

**५) इंदिरा महिला योजना-**

ही योजना सन १९९५ मध्ये सुरु केली. या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण आणि शहरातील झोपडपट्टीतील महिलांना आर्थिक स्वरुपात स्वावलंबन करुन दिले जाते. या योजनेतून स्वयंरोजगार व आर्थिक उत्पन्न प्राप्त करुन दिले जाते..

**६) बालिका समृध्दि योजना**

देशातील बालिका सुदृढ व शिक्षित असाव्यात या हेतूने बालिका समृध्दी योजना सन १९९७पासून सुरु केली. या योजनेमध्ये गरीबी रेषेच्या खालील कुंटूबामध्ये जन्माला येणाऱ्या बालिकांच्या मातांना पौष्टिक आहार आणि बालिकांच्या १० वी पर्यंतच्या शिक्षणासाठी रोख रक्कम दिली जाते.

**७) कामधेनु योजना**

गरजू महिलांना घरीच बसून काम मिळावे व त्या आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होता यावे या हेतूने १९९८ मध्ये कामधेनू योजना सुरु केलीः जिल्हा परिषद, महानगरपालिका, स्थानीक स्वराज्य संस्था तसेच शासकीय विभाग व निमशासकीय संस्थांना लागणारे गणवेश, चादरी, खोळ, डस्टर, खडू, झाडू, तसेच खाद्यपदार्थ, मसाले, लोणचे, पापड, इत्यादी आवश्यक जिनसा पूरवठ्याची कामे नोंदणीकृत महिला संस्थांना देण्यात येतात.

**८) जिजामाता**

१ मे १९९९ या महाराष्ट्र दिनापासून महाराष्ट्र शासनाने जिजामाता महिला आधार योजना सुरु केली आहे. ही योजना कुटुंब प्रमुखाचे अपघाती निधन झाल्यास त्याची पत्नी व मुले अनाथ होतात. अशा विधवा महिलावर आलेल्या संकटात आर्थिक मदत मिळावी हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.या योजनेचा लाभ फक्त केशरी व पिवळया रंगांच्या शिधापत्रीकाधारक सर्व कुटूंबाना मिळतो.

**९) स्वाधार योजना**

आर्थिक दृष्ट्या अडचणीत असलेल्या महिलांसाठी स्वाधार ही योजना सन २००१-२००२ मध्ये सुरु करण्यात आली. कोणताही सामाजिक, आर्थिक आधार नसणाऱ्या विविध अडचणीत जीवन जगणाऱ्या वंचीत मुली महिला यांना मुलभूत व प्राथमिक गरजा उपलब्ध करुन देणे, मानसिक आधार, योग्य समुपदेश करणे, शिक्षण व प्रशिक्षण देणे तसेच गरजु महिलांना वैद्यकीय, न्यायालयीन आणि इतर सेवाची तरतूद करणे यासारखे मुख्य उद्देशांनी ही योजना सुरु करण्यात आली आहे. महिलांना मदतीसाठी देशात २०११ पर्यंत ३३१ स्वाधार केंद्रे व २२३ महिला मदत केंद्रे स्थापन झाली आहेत.

**१०) उज्वला योजना**

भारत सरकारच्या महिला व बाल विकास मंत्रालयाने (उज्वला) ही सर्वसमावेशी योजना २००७ मध्ये सुरु केली. या योजनेचा मुख्य उद्देश महिलांच्या होणाऱ्या अनैतिक मानवी व्यापारास प्रतिबंध घालणे हा आहे. या योजनेची अंमलबजावणी

गैर सरकारी संघटना (NGOS) च्या साहाय्याने केली जाते. या योजनेचे प्रतिबंध, बचाव, पुर्नवसन. पुर्नएकात्मीकरण, स्वदेशी पाठवणूक असे पाच घटक आहेत.

या योजनेव्दारे सामुहिक सतर्कता गट, किशोरवयीन गट याची स्थापना करणे, जाणीव निर्मिती, कार्यशाळा यासारख्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. शोषित स्थानाहुन पिडीत महिलांना सुरक्षित बाहेर काढले जाते. विविध सेवा पूरवून पीडीत महिलांचे पुनर्वसन व समाजाशी पुन्हा एकात्मीकरण घडवून आणण्याचे काम देखील केले जात आहे. या योजनेअंतर्गत पात्र NGOS यांना वरील कार्य करण्यासाठी सहाय्य केले जाते. आतापर्यंत १४७ प्रकल्पांना मान्यता दिली आहे. यात ७४ पुर्नवसन ग्रहाचा देखील समावेश आहे.

**११) सबला योजना**

देशातील किशोरवयीन मुलीच्या सबलीकरणासाठी ‘सबला’ या योजनाची सुरुवात २०१०-११ मध्ये करण्यात आली. देशात २०११ च्या जनगणनेनुसार १२१ कोटी लोकसंख्या वास्तव्यात आहे. त्यापैकी किशोरवयीन मुलींची संख्या १७ टक्के आहे. देशाच्या राष्ट्रीय विकासात एक महत्वपूर्ण संसाधन म्हणून वापर केला जाऊ शकतो. म्हणून त्यांच्या आरोग्य व विकास दृष्टीने केलेली गुंतवणूक राष्ट्राच्या हिताचीच आहे. या सर्व बाबीचा विचार करुन देशातील २०० जिल्ह्यात ही योजना प्रायोगिक तत्वावर राबविली जात आहे. ही योजना राज्यसरकार व केंद्र सरकार याच्या संयुक्त प्रयत्नाने चालविली जाते. अंगणवाडी केंद्र या योजनेअंतर्गत सेवा प्रदान करण्यासाठी केंद्र बिंदु म्हणून कार्य करत आहे.

या शिवाय महिलाच्या सबलीकरणासाठी शासनाच्या विविध योजना देशभरामध्ये राबविल्या जातात. या योजनांच्या माध्यमातून वर्तमानकाळात महिला पुरूषांच्या खांद्यास खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात कार्य करतांना आढळून येतात.

**निष्कर्ष :**

स्वातंत्र प्राप्ती नंतर भारतीय संविधान मध्ये महिला विकासासाठी एक नवे पर्व सुरू झाले. संविधानाच्या माध्यमातून महिलांना समान हक्क, महिलांची स्थिती सुधारण्यासाठी विविध कायदे तयार केले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारी प्रयत्नातून शिक्षणाचा प्रचार-प्रसार होऊन महिला शिक्षित होऊन शिक्षित महिलांची वृध्दी झाली. २० शतकातील महिला विचारांना चालना मिळाली व परिवर्तनाला सुरूवात झाली. शिक्षणप्रचार, सामाजिक सुधारणा व वृत्तपत्रातून होणारे सामाजिक प्रबोधन यामुळे महिलांच्या विषयी दिशा मिळाली. शासनाच्या वतीने महिलांना सबलीकरणासाठी जन्माला येणाऱ्या हक्काच्या रक्षणापासून ते उच्च शिक्षण, विविध क्षेत्रातील संधी, आर्थिक सक्षमीकरण तसेच सामाजिक सुरक्षिकतेसाठी विविध योजना राबवत आहे. सर्व स्तरातील महिलांनी या योजनांचा लाभ घेवून आपल्या अधिकाराबाबत जागृत राहून नव्या भूमिका व नवी आव्हाने स्विकारली पाहिजे. या योजनाची प्रभावीपणे अमलबजावणी झाल्यास सर्वांगीण विकास घडून येईल.

**संदर्भसूची :–**

1. उडसे उमा (१९९७) भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
2. राजपूत धोंडीराम (२०११) सक्षम महिला, शुभ प्रकाशन, औरंगाबाद
3. कोळंबे रंजन (२०१२) मानव संसाधन विकास व मानवाधिकार, भागीरथ प्रकाशन, पुणे
4. कमलेश कुमार (२००५) महिला सशक्तिकरण, एनक्लब बुक प्रकाशन, जयपूर
5. अरोडा.एस. सी (२००८) महिला सशक्तिकरण की अवधारणा
6. w.w.wcd.nic.in
7. w.w.w.childlineindia.org.in